# हिंजवडी पोलीस स्टेशन

## प्रेसनोट ता.३०/०१/२०२३

२ किलो ६३१ ग्रॅम अमली पदार्थ गांजा विक्री करीता जवळ बाळगणा एक इसम व पिस्टल हत्यार जवळ बाळगणा-या मारुंजी येथील एक इसमाचे विरुध्द हिंजवडी पोलीसांची कारवाई.

पोलीस स्टेशन हदिद्त चालणारे अवैध धंदे विरुध्द कारवाई करुन अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करण्याचे मा.पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांचे आदेश असलेने त्या अनुशंगाने मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो यांचे आदेशान्वये हिंजवडी पोलीस स्टेशन कडील अवैध धंदे विरुध्द पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक अजितकुमार खटाळ व त्यांचा स्टाफ असे काल दिनांक २९/०१/२०२३ रोजी पोलीस स्टेशन हदिद्त पेट्रोलींग करीत असताना सरकार चौक, मारुंजी ता.मुळशी जि.पुणे. येथे एक इसम त्याचे रहाते घरात अमली पदार्थ् गांजा जवळ बाळगुन विक्री करीत असलेबाबत त्यांना माहीती मिळाल्याने सदर माहीती मा. वपोनि सो विवेक मुगळीकर यांना श्री सपोनि खटाळ यांनी दिली.त्यांनी मार्गदर्शन करुन पुढील कारवाई करण्याचे आदेश दिले त्यानंतर हिंजवडी पोलीस स्टेशन अंर्तगत असले एम.आयडीसी चौकीचे प्रभारी अधिकारी सपोनी संदिप देशमुख व अवैध धंदे प्रतिबंधक पथकाचा स्टाफ असे छापा कारवाईचे साहीत्य व दोन पंचासह सरकार चौक,मारुंजी येथे गेले असता जगताप यांचे चाळीतील रुम नंबर ३ मधुन एक इसम पोलीसांची चाहुल लागताच गांजा असलेली पिशवीसह तेथुन पळुन जात असताना त्यास पोलीसांनी शिताफीने ताव्यात घेऊन त्याचे कडील कापडी पिशवी तपासली असता त्यामधे गांजा असलेचे दिसुन आले त्याचे ताब्यातुन एकुन ६५,७७५/- रुपयाचा २ किलो ६३१ ग्रॅम अमली पदार्थ गांजा जप्त करुन त्याचे विरुध्द ,एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२०(ब) (ii) (ब)प्रमाणे गु न्हा दाखल करणेत आला आहे.

अमली पदार्थ गांजा विक्री करीता जवळ बाळगणारे इसम अरोपीचे नाव खालील प्रमाणे आहे.

१)मंगेश सहदेव गायकी नवनाथ जगताप यांची चाळ, रुम नंबर ३, सरकार चौक, मारुंजी, ता. मुळशी जि .पुणे.

तसेच दिनांक २८/०१/२०२३ रोजी बेकायदेशिर रित्या पिस्टल हत्यार व एक काडतुस जवळ बाळगून असलेले एका इसमास अनंतानगर लक्ष्मी चौक मारुंजी येथुन ताब्यात घेऊन त्याचे विरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५),महा.पो.अधि कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे कारवाई केली आहे.

पिस्टल हत्यार व एक काडतुस जवळ बाळगून असलले इसमाचे नाव खालीलप्रमाणे.

१)गणेश पंढरी कांबळे व.व.२३ रा.आनंतानगर लक्ष्मी चौक मारुंजी ता.मुळशी जिल्हा-पुणे मुळ गाव रा.मुळज ता.उमरगा जिल्हा-उष्मानाबाद.

सदरची कारवाई मा.विनयकुमार चौबे सो,पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड,मा.मनोजकुमार लोहीया सह.पोलीस आयुक्त सो,मा.डॉ संजय शिंदे सो,अप्पर पोलीस आयुक्त सो.मा.काकासाहेब डोळे सो,पोलीस उप आयुक्त परि.२, मा.श्रीकांत डिसले ,सहा.पोलीस आयुक्त,वाकड विभाग वाकड,यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,डॉ.विवेक मुगळीकर,सुनिल दहिफळे पोलीस निरीक्षक (गुन्हे),सोन्याबापू देशमुख पोलीस निरीक्षक(गुन्हे),अवैध धंदे विरोधी पथकाचे प्रमुख सपोनि अजितकुमार खटाळ,सपोनी संदिप देशमुख,सहा.पो.फौजदार महेश वायबसे, पोहेकॉ/१०४१ संतोष डामसे,पोहवा/७८४ महेश शिंदे,अमंलदार/२६५९ रवी पवार,पोअमंलदार/२६९४ गाडे यांनी केली आहे.

(काकासाहेब डोळे)<br>
पोलीस उप-आयुक्त परि-२,<br>
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,

Scanned with OKEN Scanner